# लोककथा : निर्मिती आणि ग्रंथसंपदा

# Folklore: Creation and Texts

डॉ. सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
इ मेल : veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा :

लोकसाहित्य सामूहिक निर्मिती असते. ती अनाम असते. ही निर्मिती तो समूह ज्या भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक परंपरेतून आलेला असतो त्या सामूहिक वृत्तीचा, परिसराचा, सांस्कृतिक धारणेचा मौखिक स्वरूपात झालेला आविश्कार असतो. अशा या मौखिक आविष्कारातूनच लोकसाहित्याचा एक महत्त्वाचा घटक असलेल्या कथा प्रसारास मदत झाली. कथांचे मानवाला विलक्षण आकर्षण असल्यामुळे जेथे जेथे मानवाने संचार केला तेथे तेथे कथा बरोबर नेली. संचरणासाठी त्याला अनेक कारणे होती. व्यापारी, प्रवासी, खलाशी, मच्छीमार, युद्धासाठी ठिकठिकाणी जाणारे सैनिक यांच्याद्वारे कथेचा विकास झाला. ही कथा मौखिक स्वरूपाची असल्यामुळे त्या त्या प्रदेशविशेषांची त्यात भर पडत गेली. कथेचा उत्तरोत्तर विकास होण्याचे हेच कारण आहे. सृष्टीतील मानवाला हितकारक आणि बाधक घटकांचे ज्ञान लोकांपर्यंत पोचविण्यासाठी कथांचा जन्म झाला. जगातील दुसऱ्या कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या पूर्वीच भारतीयांनी दैवतकथा, अद्भुतकथा, कल्पितकथा, प्राणिकथा, नीतीबोधकथा आणि कहाण्या यांना अभिजात साहित्याचे स्वरूप देऊन गौरविलेले आहे. जातककथा, जैन कथा, बृहत्कथा, पंचतंत्र, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, सिंहासनबत्तीशी, हितोपदेश, जातिपुराणकथा या ग्रंथांनी लोककथाप्रवाह चैतन्यमयी केलेला आहे. अद्भुताचे प्राबल्य, पात्रचित्रण सांकेतिक स्वरूपाचे, ठरावीक संकेतांचे पालन, कौटुंबिक चित्रण हे लोककथांचे विशेष आहेत. लोककथेतून व्यक्त होणारी समाजनीतिकल्पना अत्यंत उच्च प्रतीची व निकोप स्वरूपाची आहे.

## Abstract:

Folklore is a collective creation. It is anonymous. This creation is a verbal invention of the collective attitude, environment and cultural perception of the geographical, linguistic and cultural traditions from which the group comes. It was this oral invention, an important element, which helped spread the element of folklore. Because of the extraordinary fascination with stories, human beings have taken stories with them wherever they communicated. There were several reasons for the transmission. The story was developed by merchants, travelers, sailors, fishermen, and soldiers wherever they went. As the story was oral, the specific region was added to it. This is the reason why the story is progressively evolving. Stories were born to convey to people the knowledge of the benefits and disadvantages of creation. Before any other civilized nation in the world, Indians have glorified myths, legends, fables, proverbs and stories in the form of classical literature. Jatakkatha, Jain Katha, Brihadkatha, Panchatantra, Vetalpanchvishi, Shukbahattari, Simhasanbattishi, Hitopadesh, Jatipuranakatha have enlivened the flow of folklore. The predominance of wonder, characterization of symbolic form, adherence to certain signs, family portrayal are the specialties of folklore. The social ideology expressed through folklore is of a very high standard and innocent.

## बीजशब्द :

कथा, अद्भुत, समाज, रंजकता, पात्र, ज्ञान, मानव, परंपरा, प्राचीन

## प्रस्तावना :

'लोकसाहित्य सामूहिक निर्मिती असते. ती अनाम असते. ही निर्मिती तो समूह ज्या भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक परंपरेतून आलेला असतो त्या सामूहिक वृत्तीचा, परिसराचा, सांस्कृतिक धारणेचा मौखिक स्वरूपात झालेला आविष्कार असतो.'[१] जगातील कुठल्याही प्रदेशात लोककथा आढळणार नाहीत, असे शक्य नाही. आदिम काळापासून कथा सांगणे आणि ऐकणे हा मानवाचा छंद आहे. त्यामुळेच कुठेही गेले तरी कथा हा वाङ्मयप्रकार आपल्याला दिसणारच. देशकालाचे, जातिधर्माचे, सुसंस्कृतपणाचे कथेला बंधन नाही. नागरी समाजाने विचारपूर्वक कथा लिहिण्याआधी लोककथा अस्तित्वात होत्या. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्या पिढीकडे अशा संक्रमित होत राहिल्या. अद्‌भुतता, करमणुक या गुणांनी परिपूर्ण अशा या कथा रंजनमूल्यांबरोबरच बोधांचे अमृतसिंचन करताना दिसतात.

## लोककथांचीनिर्मिती:

१. आदिमानव दैनंदिन जीवनात जे अनुभव घेत होता. ते सगळे त्याच्यासाठी नवीन होते. सृष्टीतील विविध घडामोडी पाहणे, त्यांना नाव देणे, त्यांचे अनुभव दुसऱ्यांना सांगणे असा मानवाच्या मनोवस्थांचा प्रवास होत होता.
२. आदिमानवाला सृष्टीचे ज्ञान होताना न समजलेल्या गोष्टींसाठी देवत्व किंवा अलौकिकत्व बहाल करण्याची मानवाची प्रवृत्ती होऊ लागली. त्याचवेळी या ज्ञानव्यापारात श्रद्धा किंवा धर्मभावना निर्माण झाली. सृष्टीतील मानवाला हितकारक घटकांसाठी श्रद्धा आणि बाधक घटकांसाठी भय निर्माण झाले. हेच ज्ञान लोकांपर्यंत पोचविण्यासाठी कथांचा जन्म झाला.
३. लोककथा निर्मितीच्या तिसऱ्या अवस्थेत मानवाच्या श्रद्धा आणि भय यातून आख्यान, विधीकथा निर्माण झाल्या. नीतीकथा, मनोरंजन अशी भर त्याच्यात पडत गेली. जनसामान्यांमध्ये प्रचलित होत राहिल्यामुळे त्यात परिवर्तन होत गेले. हया लोककथा जनसामान्यांची संपत्ती बनल्या.
४. चौथ्या अवस्थेत या लोककथा आपल्या मूळ स्रोतापासून तुटल्या, आणि विविध मानवसमूहांबरोबर जगातील विविध भौगालिक प्रदेशात प्रसार पावल्या. पुढे त्या त्या भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार त्याचे स्वरूप पालटत गेले. त्याला नवनवीन शाखा फुटत गेल्या. या कथांचे स्वरूप इतके बदलले, की मूळ कथेशी त्यांचा संबंध उरला नाही.
५. लोकांमध्ये रूढझालेल्या या कथा आपल्या वैशिष्ट्यांसकट परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोचत राहिल्या. अजूनही या लोककथा जनमानसात जिवंत आहेत. जरी त्यांच्यात स्थलकालपरत्वे बदल होत असले तरीही या लोककथा आपल्या बदलांसकट पुढेही अशाच चालत राहतील.

## लोककथांची भारतीय परंपरा :

भारतात लोककथेची परंपरा अतिप्राचीन असून समृद्ध आणि संपन्न आहे. अनादि कालापासून धार्मिकतेची भाविकतेची दृष्टी प्रत्येक भारतीयाच्या मनात वसत आलेली आहे. ही परंपरा जोपासण्याचे काम पूर्वी कथक करीत असत. काही अभ्यासकांच्या मते ह्या लोककथांची जन्मभूमी भारत हीच आहे. थिओडोर बेनफे या अभ्यासकाने तर भारताला जागतिक लोककथांचे जनकत्व बहाल केले आहे. पं. महादेवशास्त्री जोशी म्हणतात, 'जगातील दुसऱ्या कोणत्याही सुसंस्कृत राष्ट्राच्या पूर्वीच भारतीयांनी दैवतकथा, अद्‌भुतकथा, कल्पितकथा, प्राणिकथा, नीतिबोधकथा आणि कहाण्या यांना अभिजात साहित्याचे स्वरूप देऊन गौरविलेले आहे. कथागीताकडे बघण्याची भारतीयांची दृष्टी भाविकांची आहे.' काही अभ्यासकांच्या मते भारत हा लोककथांचे उगमस्थान नसले तरीही लोककथांच्या क्षेत्रातली भारताची समृद्धी कोणीही अमान्य करीत नाही. वैदिक संहितेमध्येही कथांची बीजे उपलब्ध आहेत. उपनिषदातही संक्षिप्त लहान कथा आलेल्या आहेत. लोककथांचा सर्वात प्राचीन आणि तितकाच विशाल संग्रह म्हणजे 'गुणाढ्याची बृहत्कथा' होय. हा ग्रंथ पैशाची भाषेत लिहिलेला होता. त्याचा अनुवाद बृहत्कथा श्लोकसंग्रह, बृहत्कथामंजिरी व कथासरित्सागर या नावाने संस्कृतात उपलब्ध आहे. पंचतंत्राचे स्थान तर कथासाहित्यात अद्वितीय आहे.

## जातककथा :

'जातक' या शब्दाचा अर्थ जन्माची कथा असा होतो. त्याचप्रमाणे 'पूर्वजन्मीची हकिकत असाही अर्थ होतो. बौद्ध परंपरेप्रमाणे या बोधिसत्त्वाच्या पूर्वजन्मीच्या कथा आहेत. बुद्धाच्या बोधिसत्त्व अवस्थेतील या गोष्टी असून त्रिपिटकाच्या स्वरूपात त्या एकत्र केलेल्या आहेत. या कथात बुद्ध कधी नायक, कधी दुय्यम व्यक्तिरेखांच्या स्वरूपात तर कधी प्रेक्षकाच्या स्वरूपात दिसून येतो. 'जातककथा' हा भारतीय लोककथांच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. या कथा म्हणजे भगवान बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या कथा, परंपरेने समाजात प्रसृत असणाऱ्या अनेक अद्‌भुतकथा, नीतिकथा, प्राणीकथा, विनोदी कथा यांचा उपयोग आपल्या धर्माच्या चौकटीत बसवून बौद्ध भिक्षूंनी धर्मप्रसारासाठी केला. धर्मप्रसार करीत असताना

या कथा बौद्ध भिक्षूंनी भारताबाहेर नेल्या. यामुळे त्याचा प्रसार दूरपर्यंत झाला. यावरून लोककथा आणि जातककथा यांचा परस्परसंबंध लक्षात येतो.

## जैनकथा :

बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी जसा जातककथांचा उपयोग केला गेला तसाच जैन धर्मांच्या प्रसारासाठी जैन चूर्णींचा उपयोग केला गेला. जैनांच्या नीतिपर कथांना अवचूर्णी, अवचूर्ण, चूर्णी व चूर्णक अशी नावे आहेत. जैन धर्माचा वा नीतिनियमांचा प्रसार करण्याच्या हेतूने या कथांचे लेखन करण्यात आले. महावीरांनी पारंपरिक कथांचा यात समावेश केला आहे. त्याचे मूळ स्वरूप कायम ठेवले आहे. या कथांना बोधप्रद वाटतील असे स्वरूप दिले आहे. या कथा बोधप्रद असल्या तरी नीतीची शिकवण आणि मनोरंजन या दोन्ही गुणांचा इतका सुरेख समन्वय त्यात आलेला आहे की, त्या अत्यंत परिणामकारक वाटतात.

## बृहत्कथा :

भारतीय लोककथेच्या परंपरेत गुणाढ्याच्या बृहत्कथा या कथासंग्रह ग्रंथाला महत्त्वाचे स्थान आहे. आज प्रचलित असलेल्या लोककथेचे रूप बृहत्कथेत पहावयास मिळते. शालिवाहन राजाच्या पदरी असलेल्या गुणाढ्य नावाच्या पंडिताने 'बृहत्कथामंजिरी' हा ग्रंथ पैशाची भाषेत लिहिला. परंतु संस्कृत भाषा सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या शालिवाहन राजाने पैशाची भाषा गौण मानून या ग्रंथाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे निराश होऊन गुणाढ्यांनी एकेक पान वाचून ते अग्नीला अर्पण करण्यास सुरुवात केली. हे समजल्यावर शालिवाहन राजाला पश्चात्ताप झाला. त्याने तात्काळ गुणाढ्याचे अग्निसमर्पण थांबवले, पण तोपर्यंत बराच भाग जळून गेला होता. तरीही उरलेल्या संग्रहानेही त्याला अजरामर केले. या कथा सर्व थरांतील लोकांचे मनोरंजन करण्यासोबत बोध देणाऱ्या होत्या. याचे संस्कृतमध्ये तीनवेळा भाषांतर झाले. पहिले 'बृहत्कथाश्लोकसंग्रह' हा ग्रंथ बुधस्वामी या नेपाळी पंडिताने आठव्या किंवा नवव्या शतकात लिहिला असावा. दुसरा 'बृहत्कथामंजिरी' हा ग्रंथ काश्मिरच्या अनंत राजाच्या पदरी असणाऱ्या क्षेमेंद्राने अकराव्या शतकात रचला. या ग्रंथातील एकूण श्लोकसंख्या ७५,००० इतकी आहे. तिसरा 'कथासरित्सागर' हा ग्रंथ सोमदेवाने लिहिला.

## पंचतंत्र :

'पंचतंत्र' या प्राचीन भारतीय लोककथांच्या संग्रहाचे कथासाहित्यातील स्थान अद्वितीय आहे. या जगप्रसिद्ध पंचतंत्राचा कर्ता विष्णुशर्मा याने पंचतंत्र हे पाच भागात लिहिले. ती पाच तंत्रे अशी आहेत. १. मित्रभेद २. मित्रसंप्राप्ती ३. ककोलूकयिम ४. लब्धप्राणाशम ५. अपरिक्षितकारकम्. पंचतंत्राचे स्वरूप प्राणिकथांसारखे असून नीतिबोधाचा उद्देश त्यातील कथांमागे आहे. नीतीशास्त्राच्या कथा असे पंचतंत्राला म्हणतात, पण यातले नीतिशास्त्र तत्त्वज्जड नाही तर येताजाता व्यवहारात आढळणारे, प्रत्ययाला येणारे आहे आणि जवळचे वाटणारे आहे. म्हणूनच ते जास्त परिणामकारक आणि मार्गदर्शक ठरते. या कथांचे स्वरूप साखळकथेसारखे आहे. एका कथेतून दुसरी कथा दुसरीतून तिसरी कथा अशी कथांची गुंफण केलेली आहे. या कथांची निर्मिती वेदकाळात झाली असावी असे वाटते. या कथांचा प्रसार जगभर झालेला आहे. पंचतंत्रातील कथांची एक स्वतंत्र शैली आहे. कथेच्या सुरुवातीला एखादी काव्यपंक्ती देऊन पुढे गद्यातील विवेचनाच्या समर्थनासाठी सुभाषितासारख्या श्लोकाची पखरण असते. सुटसुटीत कथानक, चटकदार आणि मुद्देसुद निवेदनपद्धती, वाक्प्रचारांनी मढलेली भाषा आणि आटोपशीर रचना ही पंचतंत्राची खास वैशिष्ट्ये होत. भारतीय लोककथांतील प्राणिकथांचे दालन समृद्ध करण्यात पंचतंत्रातील कथांचे महत्त्वाचे योगदान आहे.

## वेताळ पंचविशी :

राजा विक्रम आणि वेताळ यांच्या कथा पुराणकाळापासून खूप लोकप्रिय आहेत. राजा विक्रमाचे चातुर्य आणि व्यावहारिक बुद्धी यांचे वेताळाने विचारलेल्या गुढ प्रश्नांना विक्रमाने दिलेल्या उत्तराने क्षणोक्षणी दर्शन घडते. अगदी अत्याधुनिक काळापर्यंत हा वारसा लेखकांनी विशेषत: बालसाहित्यकारांनी उचलला आहे. शिवदास नावाच्या विद्वान पंडिताने लिहिलेल्या या ग्रंथात राजा विक्रमासंबंधीच्या पंचवीस कथा संस्कृत भाषेत सांगितल्या आहेत. या कथा अद्भुत आणि गूढ स्वरूपाच्या असून मनोरंजनाचे मूल्य त्यात असल्यामुळे त्या लोकजीवनात विशेष लोकप्रिय झाल्या.

## सिंहासन बत्तीशी:

वेताळ पंचविशीतील कथांप्रमाणेच सिहासनबत्तीशीतील कथांचे स्वरूप आहे. या कथांचा नायकही विक्रम राजाच आहे. साखळी कथेच्या स्वरूपातील या कथा आहेत. या कथांचे सूत्र असे सांगितले जाते की, राजा विक्रमाला इंद्राकडून बत्तीस सोन्याच्या पऱ्या म्हणजेच पुतळ्या जडविलेले एक सिंहासन प्राप्त झाले होते. राजा विक्रमानंतर ते सिहासन भूमिगत झाले. कालांतराने उज्जयिनीचा राजा भोज याला ते सापडले. राजा भोजाने सिंहासन साफ करून त्यावर बसण्याचा प्रयत्न करू लागताच सिंहासनावर जडवलेली एकेक पुतळी प्रकट होऊन बोलू लागली. प्रत्येक पुतळी भोज राजाला विक्रम राजाच्या पराक्रमाची, औदार्याची, न्यायाची, गुणसंपन्नतेची, व्यावहारिक चातुर्याची कथा सांग. कथा संपल्यावर 'विक्रम राजासारखी गुणवत्ता असेल तरच आपण या सिहासनावर बसण्यास लायक आहात, असे ती सुचवी. याप्रमाणे बत्तीस पुतळ्यांनी बत्तीस कथा सांगितल्यावर राजा भोजाला जाणीव झाली की, विक्रम राजासारखी गुणवत्ता आपल्यात नाही, म्हणून आपण या सिहासनावर बसण्यास लायक नाही. अशी विक्रम राजाची थोरवी मान्य करताच ते सिहासन आकाशात उडून गेले. या बत्तीस पुतळ्यांनी सांगितलेल्या बत्तीस गोष्टी म्हणजे 'सिहासनबत्तीशी' हा ग्रंथ होय. यातील कथा रोचक, रंजक आणि अद्‌भुतरम्य आहेत. या कथांचा उद्‌देश रंजन करणे हाच असला तरीही राज्यकारभार करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी कोणते गुण असावेत याचे सुदर मार्गदर्शन या कथांद्वारे केलेले आहे.

## शुकबहात्तरी:

'शुकबहात्तरी' हा ग्रंथ दहाव्या शतकातील असून त्याचे स्वरूप गद्यपद्यमिश्रित आहे. या कथेत कथा ऐकणारा श्रोता एक मात्र कथेत अनेक तंत्र वापरली आहेत. या कथा रंजक व चित्तवेधक स्वरूपाच्या आहेत. यातील कथासूत्र म्हणजे मदनसेन नावाचा एक व्यापारी व्यापारानिमित्त दूरगावी गेला असता त्याच्या पत्नीच्या मनात व्यभिचार करण्याची इच्छा निर्माण झाली. तेव्हा व्यापाऱ्याने पाळलेले दोन पक्षी कावळा आणि पोपट यांनी तिला उपदेश केला. कावळ्याने केलेला उपदेश तिला आवडला नाही. तेव्हा पोपटाने तिला रोज रात्री एक अशा बहात्तर कथा सांगितल्या. या कथांतून त्याने व्याभिचाराचे दुष्परिणाम कथन केलेले आहेत. या कथा रसाळ असल्यामुळे व्यापाऱ्याची पत्नी कथेत मग्न होत असे. आणि तिच्या मनातील दुराचाराची इच्छा नाहीशी होत असे. पोपटाने सांगितलेल्या या बहात्तर कथा म्हणजे शुकबहात्तरी होय. या कथांचे स्वरूप रंजक, अद्‌भुत आणि नीतिबोधाचे आहे. यात पशुपक्षांना बोलता येते ही कल्पना स्विकारलेली आहे. प्रबोधन व तत्कालीन स्त्रीजीवनाचे चित्रण या कथांमध्ये दिसते. समाजशास्त्रीय दृष्टीने अशा प्रकारच्या कथा अतिशय उपयुक्त ठरतात, असे वाटते.

## हितोपदेश :

बंगालचा राजा धवलचंद्र याच्या पदरी असणाऱ्या नारायण पंडिताने या ग्रंथाची रचना चौदाव्या शतकात केली. यात पंचतंत्रातील काही कथांचा समावेश आहे.

## जातिपुराणकथा :

भारताच्या विस्तीर्ण अशा क्षेत्रात अनेक जातीजमाती राहतात. काही जमातींच्या पुराणकथांच्या धर्तीवर रचलेल्या काही प्रादेशिक जातिपुराणकथा प्रचलित आहेत. या कल्पनाबंधापेक्षा निराळे कल्पनाबंध काही वेळा आढळून येतात. काही जातिजमाती परंपरागत देवादिकांच्या कथा कथन करण्याचे काम करतात.

अशा अनेक लोककथाग्रंथांचा आढावा घेतल्यानंतर त्यावरून लोककथेचे घटक शोधणे सोपे जाते. लोककथांच्या घटकांचा अभ्यास पाश्चात्य लोकसाहित्य विशारदांनी केला आहे तसेच भारतीय अभ्यासकांनी सुद्धा केला आहे. काही पाश्चात्य अभ्यसकांच्या मते कथेतील पात्रे, कथेची अभिवृद्धीला पूरक साधने आणि संपूर्ण 'घटना' हे लोककथांचे चार घटक सांगितले आहे. याबाबतीतील विविध मतांचा आढावा घेतल्यानंतर अनेक घटक यात सांगता येतील ते यप्रमाणे:

| | |
|---|---|
| १ अद्‌भुतरम्यता | २ कल्पनाबंध |
| ३ भ्रमणशीलता | ४ समाजचित्रण |
| ५ लोकसमजुती | ६ मूळ कथाबीजात बदल न होणे |
| ७ कथेची घटना महत्त्वपूर्ण असणे | ८ वातावरण निर्मिती |
| ९ कथेतील व्यक्ती आणि पात्रे | १० अलौकिक जीवन |
| ११ कथेतील उपमा, उत्प्रेक्षा या अलंकारांची योजना | १२ कथेचा हेतू |

१३ कथेतील तत्वे
या कथाघटकांच्या आधारे कथा विकसित होत असते.

## लोकजीवनात लोककथेचे स्थान:

ललित वाङ्मय हे कलावंताच्या वैयक्तिक आत्मविष्काराची परिणती असली तरी कलावंत एक समाजघटक म्हणून समाजात वावरत असल्याने त्याच्या कलाकृतीतही सामाजिक, सांस्कृतिक दर्शन घडतेच. तर लोकनिर्मित लोककथांत हे दर्शन घडणे अगदी स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. त्यात समाजाच्या प्राचीन जीवनाचे अवशेष सापडतात. कल्पित आणि अद्‌भुत सृष्टीसोबत वर्तमानकालीन जीवनाचा धागाही अधूनमधून आलेला दिसतो. 'लोकगीताप्रमाणेच लोकसाहित्यात लोककथांना विशेष स्थान आहे. जीवनातील रूपेरी कडा त्या लोककथांनी दीप्तीमान झाल्या आहेत. लोकसाहित्य एकप्रकारचे स्वाभाविक जीवनदर्शन घडविणारा एक महान कल्पवृक्षच आहे. लोकगीते या कल्पवृक्षाची अमृत मुळे—बुंधे आहेत तर लोककथा बुंध्यातून सरळ, मजबूत व ताठ असे उंचावत जाणारे सत्त्वखांब आहेत, कणे आहेत.'[२]

विशिष्ट प्रदेशातील लोककथांतून त्या समाजात प्रचलित असणाऱ्या धार्मिक समजुती, सामाजिक समजुती, रूढी, कुटुंबव्यवस्था यांचे दर्शन घडते. लोककथांच्या निर्मितीच्या मूळाशी लोकमानसाची प्रेरणा असते. 'लोकजीवनाचा व्यापक दृष्टीने विचार केल्यास लोकजीवन आणि लोकसाहित्य यांचे अभिन्नत्व असते असे लक्षात येईल. लोकसाहित्य म्हणजे लोकांचे जीवन जगण्याची पद्धती आते. या लोकजीवनाचा संदर्भ सोडून लोकसाहित्याचा अभ्यास करणे म्हणजे भुसा भरलेल्या प्राण्याच्या निर्जीव शरीराचे निरीक्षण करण्यासारखे आहे.'[३] लोककथेतून व्यक्त होणारी समाजनीतिकल्पना अत्यंत उच्च प्रतीची व निकोप स्वरूपाची आहे. या लोककथांनी व्यभिचारी स्त्रियांचाही व्यभिचार उघडकीस येतो व त्यांना शासन होते. मातापुत्र संबंध, बहिणभाऊ संबंध अशा अनिष्ट प्रवृत्तींचा कडक निषेध करून त्यांना पूर्णतया त्याज्य ठरविले आहे. प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे समाजाला नीतिशिकवण देण्याचे लोककथांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. अशा या लोककथांना लोकप्रतिभेचा अमृतस्पर्श झाल्याने चिरतारुण्याचा, सौंदर्याचा आणि रूप बदलण्याचा वरदहस्त लाभलेला आहे.

## निष्कर्ष:

१ सृष्टीतील मानवाला हितकारक घटकांसाठी श्रद्धा आणि बाधक घटकांसाठी भय निर्माण झाले. हेच ज्ञान लोकांपर्यंत पोचविण्यासाठी कथांचा जन्म झाला.
२. नागरी समाजाने विचारपूर्वक कथा लिहिण्याआधी लोककथा अस्तित्वात होत्या. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्या पिढीकडे अशा संक्रमित होत राहिल्या.
३ . व्यापारी, प्रवासी, खलाशी, मच्छीमार, युद्धासाठी ठिकठिकाणी जाणारे सैनिक यांच्याद्वारे कथेचा विकास झाला. ही कथा मौखिक स्वरूपाची असल्यामुळे त्या त्या प्रदेशविशेषांची त्यात भर पडत गेली.
४. भारत हा लोककथांचे उगमस्थान नसले तरीही लोककथांच्या क्षेत्रातली भारताची समृद्धी कोणीही अमान्य करीत नाही.
५. लोककथांचा सर्वात प्राचीन आणि तितकाच विशाल संग्रह म्हणजे 'गुणाढ्याची बृहत्कथा' होय.
६. जातक कथा म्हणजे भगवान बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या कथा, परंपरेने समाजात प्रसृत असणाऱ्या अनेक अद्‌भुतकथा, नीतिकथा, प्राणीकथा, विनोदी कथा यांचा उपयोग आपल्या धर्माच्या चौकटीत बसवून बौद्ध भिक्षूंनी धर्मप्रसारासाठी केला.
७.पात्रे, कथेची अभिवृद्धीला पूरक साधने आणि संपूर्ण 'घटना' हे लोककथांचे चार घटक सांगितले आहे.
८. विशिष्ट प्रदेशातील लोककथांतून त्या समाजात प्रचलित असणाऱ्या धार्मिक समजुती, सामाजिक समजुती, रूढी, कुटुंबव्यवस्था यांचे दर्शन घडते.
९.लोककथांना लोकप्रतिभेचा अमृतस्पर्श झाल्याने चिरतारुण्याचा, सौंदर्याचा आणि रूप बदलण्याचा वरदहस्त लाभलेला आहे.

## संदर्भ :

१. मोरजे, डॉ. गंगाधर, भाषा व साहित्य : संशोधन, खंड दुसरा, पृ. २७९
२. शेंडे, ना. रा., लोकसाहित्यसंपदा, पृ. ४६
३. मांडे, डॉ. प्रभाकर, लोकसाहित्याचे अंत:प्रवाह , पृ. ७

## संदर्भग्रंथ :

१. कर्वे, इरावती — मराठी लोकांची संस्कृती

२. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम – लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन
३. कुलकर्णी, दा.वि. –मराठी कथा : स्वरूप आणि आस्वाद
४. वाकोडे, डॉ. मधुकर –मराठी लोककथा
५. शेवडे, डॉ. इंदुमती –मराठी कथा : उगम आणि विकास

◆◆◆◆

Published Details
Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ), ISSN 2394-8426, Vol 7, Issue 1, Mar. 2017, pp. 51-55, IF 2.254

Suggested Citation
Mandavkar, Veera, लोककथा : निर्मिती आणि ग्रंथसंपदा Folklore: Creation and Texts (March 01, 2017). Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ), ISSN 2394-8426, Vol 7, Issue 1, Mar. 2017, pp. 51-55, IF 2.254. Available at SSRN: https://ssrn.com/abstract=3632247